## स्वातंत्र्य ! कुठे स्वातंत्र्य ?

ही गिरणी गाते यंत्रयुगाचे गाणे
खपतात हजारो येथे केविलवाणे

संसार उधळले, अ फाटले यांचे
हे स्थितप्रज्ञ परि विणती ताणेबाणे

पेरती थेंब हे निढळाच्या घामाचे
त्यांतून उगवते धनिकांसाठी नाणे

रेशमी विणावी साडी शंभर
रोज परि घरधनिणीचे नेसू लाजिरवाणे

स्वातंत्र्य ! कुठे स्वातंत्र्य ? कुणा स्वातंत्र्य ?
धनवंत जगावे यास्तव यांनी मरणे!

या दुःखी दुर्बळ बळिराजाला देखा
हा बळिराजा...?...छे...राजबळी या लेखा!

ही बैलं, औतं, जिमीन, गोठा, घरटं
की गहाणपत्री सोबत एकामेका

भरघोस येउ दे पीक, पडो दुष्काळ
भाळावर याच्या संतत चिंतारेखा

सरकार सावकारांनो अपुले भाग घ्या
आधी, उरले मुखात याच्या फेका.

स्वातंत्र्य ! कुठे स्वातंत्र्य ? कुणा स्वातंत्र्य ?
हे गुलामगिरीचे दर्शन होत नसे का?

या दुःखी दुर्बळ बळिराजाला देखा
हा बळिराजा...?...छे...राजबळी

या लेखा! ही बैलं, औतं, जिमीन, गोठा, घरटं की
गहाणपत्री सोबत एकामेका

भरघोस येउ दे पीक, पडो दुष्काळ
भाळावर याच्या संतत चिंतारेखा

सरकार सावकारांनो अपुले भाग घ्या आधी,
उरले मुखात याच्या फेका.

स्वातंत्र्य ! कुठे स्वातंत्र्य ? कुणा स्वातंत्र्य ?
हे गुलामगिरीचे दर्शन होत नसे का?

या उभ्या झोपड्या येथे साडेतीन
पसरली गाडगी मडकी तेजोहीन

दो हजार वर्षे हाच इथे देखावा
दारिद्र्य तयांना नाही आज नवीन

परळात वाळले तुकडे दो दिवसांचे
ते पोरं खाती अछूतच भिजवून

वाडगा भरोनी आई आणिल
पाणी गावात कुणाचे उंबरठे

झिजवून स्वातंत्र्य! कुठे स्वातंत्र्य? कुणा स्वातंत्र्य ?
जो महारवाडे हरेक गावातून.

'हं चला पाहुणे, पाहू अमुचा गाव
रेखीव तयाची रचना आहे राव...

ही हिंदू वस्ती स्पृश्यांचीच बरे का राहतात
केवळ उच्च कुळांतिल साव अपवाद

इराणी-तोही आर्यच आहे
त्या महारड्यांचे काढु नका परि नाव

पलिकडे नदीच्या प्रशस्त त्यांना
जागा हो उगा कशाला त्यांना भलता भाव?'

स्वातंत्र्य! कुठे स्वातंत्र्य ? कुणा स्वातंत्र्य ?
कुंपणापल्याडहि नाही अपुली धाव.....

या हिंदू वस्तित वळा जरासे खाली ही
ब्राह्मण गल्ली पहा जरा भवताली
ती शुभ्र इमारत दिसते ना त्या तिकडे ते
ब्राह्मणमंडळ....संघटना हो अपुली त्या इमारतीतच
चित्पावन संघाची ती उजव्या बाजुस माडीवरची खोली

अध्यक्ष आपुले आपस्तंब बरे का
त्या ऋग्वेद्यांवर सरशी अपुली झाली

स्वातंत्र्य! कुठे स्वातंत्र्य ? कुणा स्वातंत्र्य ?
रे कोनाड्यातहि बिळे बिळांतच पडली.

ही शाळा आहे श्वेतांबर जैनांची ही मुख्य कचेरी सारस्वत संघाची
ते पाठारे प्रभु यांचे ग्रंथागार ही केळवणी तर केवळ गुजराथ्यांची

हे भव्य मराठामंदिर इकडे
देखा ती चाळ तिमजली निव्वळ

ओस्वालांची हे राजस्थानी छात्रालय
बाजूचे ती क्रीडाशाळा सिंधातील युवकांची

स्वातंत्र्य! कुठे स्वातंत्र्य ? कुणा स्वातंत्र्य ?
अंगात प्रवृत्ती भिनली मंडूकांची......

हा पहा आमुचा सुंदर अबलख घोडा
मी खर्चहि यास्तव केला नाही थोडा

मोजून मोहरा दिल्यात अर्धा लाख
त्या नाव पित्याचे म्हटले देउन सोडा

डर्बीत धावला पठ्ठा.... आला तिसरा.....
जा प्रजेस सांगा हर्षुनि भोजन झोडा

आं! पिकली नाहित शेते? धान्यच नाही?
हे लबाड खेडूत हवा तयांना जोडा

स्वातंत्र्य! कुठे स्वातंत्र्य ? कुणा स्वातंत्र्य ?
हे सिंहासनिचे कोल्हे खाली ओढा.....

जोवरी सुखाचा घास नसे सर्वांना
जोवरी न झाल्या उन्नत अवघ्या माना

जोवरी अभंग न झाला सर्व समाज
जोवरी श्रमाविण अन्न मिळे धनिकांना

तोवरी गुलामच राहिल अपुला देश
कोठून खरे स्वातंत्र्य अशा नादांना ?

जरि निघून गेले परके अपुल्या देशी
आम्हीच आमुचे गुलाम हिंदुस्थाना!

स्वातंत्र्य! कुठे स्वातंत्र्य ? कुणा स्वातंत्र्य ?
बेहोष जनांनो! बंद कराच बहाणा......